महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४
Email ID: ropune@dtemaharashtra.gov.in

४१२, ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/वित्तीय उपाययोजना/२०२०/ 1829 दिनांक : 18 JUN 2020

प्रति,

संचालक / प्राचार्य / उपसचिव,
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था.

**विषय : कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात होणा-या अर्थव्यवस्थेवरील परिणामांबाबत वित्तीय उपाययोजना करण्याबाबत...**

संदर्भ : महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३, दिनांक ०४/०५/२०२०.

कोविड १९ च्या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम विचारात घेऊन संदर्भित शासन निर्णयान्वये विविध उपाययोजना प्रस्तावित केलेल्या आहेत.

सदर उपाययोजना विचारात घेऊन खाली उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुषंगाने **आवश्यक ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल या कार्यालयास त्वरित सादर करावा.**

(०१) कार्यक्रमांवरील खर्चांतर्गत चालू योजनांचा आढावा घ्यावा व ज्या योजना पुढे ढकलणे किंवा रद्द करण्यासारख्या असतील तरी कार्यवाही करावी.

(०२) कार्यक्रमांतर्गत सन २०२०-२१ अर्थसंकल्पीय निधीच्या फक्त ३३ % निधी उपलब्ध होईल या सूत्राच्या अधीन राहून नियोजन करावे. ३३ % निधीमध्ये केंद्र पुरस्कृत योजना व राज्य हिस्सा तसेच मानधन / वेतन / निवृत्तीवेतन / इत्यादी योजनांचा प्राधान्याने समावेश व्हावा.

(०३) या वित्तीय वर्षात कोणत्याही नवीन योजनांवर खर्च करण्यात येऊ नये, तसेच नवीन योजना प्रस्तावित सुध्दा करु नयेत.

(०४) आवर्ती व अनावर्ती खर्चामध्ये वाढ होईल अशी कोणतीही योजना प्रस्तावित करु नये.

(०५) कोणतीही खरेदी प्रस्ताव सादर करु नये, तसेच संस्था स्तरावर मंजूर करु नये.

(०६) विभागात फर्निचर दुरुस्ती, झेरॉक्स, मशिन, संगणक, उपकरणे, नैमित्तिक कार्यशाळा, सेमिनार व भाड्याने कार्यालय घेणे इत्यादी बाबींवरील खर्चावर सध्या प्रतिबंध आहेत. तरी असे कोणतेही प्रस्ताव सादर करु नयेत, तसेच संस्था स्तरावर मंजूर करण्यात येऊ नयेत.

(०७) कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तूंच्या मर्यादित खरेदीकरिता वितरित निधीच्या ७५ % च्या मर्यादेत अनुमती राहील.

(०८) केंद्र पुरस्कृत कार्यक्रमांतर्गत व बाह्यसहाय्यित प्रकल्पांतर्गत, केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ३३ % कार्यक्रमावरील खर्च निधीच्या मर्यादेत विहीत पध्दतीने खरेदी अनुज्ञेय राहील.

(०९) कोणतेही बांधकाम प्रस्ताव सादर करु नयेत, तसेच निविदा सुध्दा प्रकाशित करु नयेत.

(१०) कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये.

(डॉ. दि. रा. नंदनवार),
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे परिपत्रक या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी रवाना.

E:\my documents\Misc.doc\87